डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना-
विशेष घटक योजना (२४२५ १२२३).
सुधारीत कार्यपध्दतीबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: व्यासयो ०९१७/प्र.क्र. २१०/२-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शा.नि.क्र विघयो २०१०/प्रक्र २६/विघयो, दिनांक १३ एप्रिल, २०१७

प्रस्तावना :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या वित्तीय वर्षापासून अनुसूचित जाती उपयोजनेचा जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे, त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देणे, पुनर्विनियोजने करणे इ. बाबत सुधारीत कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी हे जिल्हयाच्या अनुसूचित जाती उपयोजनेसाठी निधी वाटपासंबंधात नियंत्रक अधिकारी रहाणार आहेत. ते त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यन्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यास सक्षम राहतील.

शासन परिपत्रक :-

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (विशेष घटक योजना) (२४२५ १२२३) या योजनेअंतर्गत आतापर्यंत या विभागामार्फत अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येत होती. सदर अर्थसंकल्पीय तरतूदीचे वितरीण सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास करण्यात येत होते. तदनंतर या निधीचे वितरण जिल्हास्तरावर करण्यात येत होते.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या सुधारीत कार्यपध्दतीनुसार विशेष घटक योजनेअंतर्गत अर्थसंकल्पीय तरतूद त्या विभागाकडून करण्यात येईल. तरी सन २०१७-१८ या वर्षापासून या विभागाकडून सदरचा निधी संबंधित जिल्हाधिकारी यांना वाटप करण्यात येऊन सदर निधी जिल्हा स्तरावरील कार्यन्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यात येणार आहे.

३. प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी सक्षमरित्या होण्याकरीता सदर योजनेवर होणा-या खर्चाबाबतही सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी आढावा घ्यावा. सदर योजनेस अनुदान कमी पडत असल्यास त्याबाबतही कळविण्यात यावे.

४. सदर सुधारीत कार्यपध्दती सूचना या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७११०२१२४८१९८००२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2017.11.02 12:37:27 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
४) कार्यासन अधिकारी (विघयो), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई
५) अवर सचिव (कार्या १७ स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
६) निवड नस्ती.